आजचा शुभ विचार
स्वप्ने पाहणाऱ्यांना अडथळे आव्हानांचे संकेत म्हणून दिसतात, निराशेचे नाही. स्वप्नांच्या पीछ्याने जाताना, तुमच्या मनाची शक्ती वाढते.

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-67 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thuseday 15 July 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ६७ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ मंगळवार, दि. १५ जुलै २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये

## मारहाण करताना व्हिडीओ रेकॉर्ड करु नका

### या विधानामुळे राज ठाकरेंच्या अडचणी वाढणार? पोलीस महासंचालकांकडे तक्रार, कारवाई करण्याची मागणी

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------------



गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात हिंदी भाषा आणि मराठी विरुद्ध अमराठी भाषेच्या मुद्द्यांवरून चांगलाच वाद निर्माण झाल्याचं पाहायला मिळत आहे. यावरून राज्यातील राजकारण देखील चांगलंच तापलेलं आहे. हिंदी भाषा सक्तीचा निर्णय रद्द केल्यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र येत मुंबईत एक मेळावा घेतला होता. या मेळाव्यात बोलताना राज ठाकरे यांनी विविध मुद्यांवर भाष्य केलं. मात्र, याच भाषणात राज ठाकरे यांनी केलेल्या एका वक्तव्यावरून आता तक्रार करण्यात आली आहे. त्यामुळे राज ठाकरे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी अलिकडेच मुंबईत केलेल्या एका जाहीर भाषणादरम्यान एका वक्तव्याबाबत आक्षेप घेण्यात आला आहे. दरम्यान, मराठी भाषेच्या मुद्द्यांवरून परप्रांतीयांना मारहाण करण्यात आल्याच्या काही घटना घडल्या होत्या. या घटनेचे काही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल देखील झाले होते. त्यानंतर या घटनेवरून भाजपा आणि मनसेच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचं राजकारणही रंगलं होतं. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी भाषणात बोलताना म्हटलं होतं की, 'मारहाण करताना व्हिडीओ रेकॉर्ड करू नका.'

राज ठाकरे यांचं हे विधान द्वेषपूर्ण आणि भडकाऊ असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यांच्या या वक्तव्यावरून संताप व्यक्त करण्यात येत आहे. याबाबत राज ठाकरे यांच्याविरोधात पोलीस महासंचालकाकडे तीन वकिलांनी लेखी तक्रार केल्याची माहिती समोर आली आहे. या तक्रारीत राज ठाकरे यांचे काही विधाने सामाजिक अशांततेला प्रोत्साहन देणारे असल्याचं म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त टाईम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.

दरम्यान, राज ठाकरे यांनी भाषणात केलेल्या परप्रांतीयांबाबतच्या विधानामुळे राज्यातील सामाजिक सलोखा आणि कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणारी आहेत. त्यामुळे राज ठाकरे यांच्यावर राष्ट्रीय सुरक्षा कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करत कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, राज ठाकरे यांनी त्यांच्या भाषणात मीरा भाईंदर येथील घटनेचा संदर्भ देत परप्रांतीयांबाबत सांगत उठसूट मारायची गरज नाही. मात्र, जास्त नाटकं केली तर कानाखाली आवाज काढला पाहिजे, असंही राज ठाकरे यांनी म्हटलं होतं.

## शाळांमध्ये होणाऱ्या पायाभूत चाचणीमध्ये यंदा एक महत्त्वाचा बदल

अभिजित कुलकर्णी
पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------------




राज्यातील शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खासगी अनुदानित शाळांतील घेतल्या जाणाऱ्या पायाभूत चाचणीतून यंदा इयत्ता नववीला वगळण्यात आले आहे. गेल्यावर्षी घेण्यात आलेल्या पायाभूत चाचणीमध्ये नववीचाही समावेश होता. मात्र, यंदा नववीला का वगळण्यात आले, या बाबतचे नेमके कारण कळू शकलेले नाही.

प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्तानिहाय अपेक्षित अध्ययन संपादणूक प्राप्त केली आहे की नाही, याची पडताळणी करून अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ होण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) नुकतेच तीन नियतकालिक मूल्यांकन चाचण्यांचे वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार राज्यातील शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खासगी अनुदानित शाळांतील दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची ६ ते ८ ऑगस्ट या कालावधीत पायाभूत चाचणी घेतली जाणार आहे. त्यात दहा माध्यमांतील विद्यार्थ्यांची प्रथम भाषा गणित, तृतीय भाषा इंग्रजी या विषयांची चाचणी घेतली जाणार आहे.

पायाभूत चाचणी मागील इयत्तेचा अभ्यासक्रम, मुलभूत क्षमतांवर आधारित असणार आहे. तसेच ऑक्टोबर शेवटचा आठवडा ते नोव्हेंबर पहिला आठवडा या दरम्यान संकलित मूल्यमापन चाचणी १, तर एप्रिल २०२६मध्ये संकलित मूल्यमापन चाचणी २ घेतली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

पायाभूत चाचणीच्या वेळापत्रकानुसार दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची ६ ऑगस्ट रोजी प्रथम भाषा, ७ ऑगस्ट रोजी गणित, ८ ऑगस्ट रोजी तृतीय भाषा इंग्रजी या विषयांच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. शालेय वेळापत्रकानुसार सकाळ किंवा दुपारच्या सत्रात परीक्षेचे नियोजन करण्याचे स्वातंत्र्य देण्यात येत आहे. स्थानिक परिस्थितीनुसार काही तारखांमध्ये बदल करायचा झाल्यास संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी एससीईआरटीची पूर्वपरवानगी घेऊन बदल करावा. लेखी परीक्षेनंतर वैयक्तिक स्वरुपात तोंडी परीक्षा घ्यावी. विद्यार्थी संख्या जास्त असल्यास दुसऱ्या दिवशी उपलब्ध वेळेनुसार घ्यावी. चाचणीसाठीच्या प्रश्नपत्रिका एससीईआरटीकडून विद्यार्थिनिहाय १४ ते २८ जुलै या कालावधीत पुरवल्या जाणार आहेत.

गेल्या वर्षीचे पायाभूत चाचणीचे वेळापत्रक तपासले असता त्यात नववीचाही समावेश असल्याचे दिसून आले. या अनुषंगाने माजी मुख्याध्यापक महेंद्र गणपुले म्हणाले, सुरुवातीला पायाभूत चाचणीमध्ये दुसरी ते आठवी या इयत्तांचाच समावेश होता. गेल्यावर्षी त्यात इयत्ता नववीचाही समावेश करण्यात आला. मात्र, यंदाच्या वेळापत्रकात इयत्ता नववीला वगळण्यात आल्याचे दिसते. त्यामुळे ही धरसोड का करण्यात येत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, इयत्ता नववीला पायाभूत चाचणीतून का वगळण्यात आले, या बाबत जाणून घेण्यासाठी 'एसससीईआरटी'शी संपर्क साधला असता प्रतिसाद देण्यात आला नाही.

## शहराला मिळणार अतिरिक्त पाणी

### किकवी धरणाच्या भूसंपादनाचे दर निश्चित; प्रकल्पाला मिळणार चालना

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------



मागील वर्षी राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळालेल्या किकवी धरणाच्या भूसंपादनासाठी दर निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकल्पाला चालना मिळण्यास मदत होणार आहे. धरण पुर्णत्वास आल्यानंतर त्र्यंबकेश्वरसह नाशिक महापालिका क्षेत्राचा पाण्याचा मोठा प्रश्न मार्गी लागणार आहे.

किकवी धरणाच्या भूसंपादन प्रक्रियेस गती देण्यासाठी नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात बैठर पार पडली. यामध्ये दर निश्चित करण्यात आले. या प्रकल्पासा अधिग्रहीत करण्यात आलेल्या जमिनींचे गुणाकार पद्धतीने मूल्यांकन करण्यात येणार आहे.

तसेच शासनातर्फे बाधित शेतकऱ्यांना २५ टक्के अतिरिक्त अनुदान देण्यात येणार असल्याचेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करूनच भूसंपादन प्रक्रिया पारदर्शकपणे राबवली जाणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

दरम्यान, आक्टोंबर २०२४ मध्ये झालेल्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत हे धरण पुर्ण करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. तत्पुर्वी या प्रकल्पासाठी आवश्यक १७२.४६८ हेक्टर पर्यायी वनजमीन दि.२८ डिसेंबर २०१० अन्वये वनविभागाकडून वर्ग करण्यात आली. तत्कालीन पर्यावरण आणि वन विभागच्या केद्रींय मंत्री जयंती नटराजन यांच्या मंत्रालयाकडून मान्यता देण्यात आली होती.

तसेच त्र्यंबकेश्वर तालुक्यातील १० गावातील ७३४.५४२ हेक्टर खाजगी जमिनींची संयुक्त मोजणी पूर्ण करण्यात आली. त्यानुसार तळवाडे, ब्राह्मणवाडे, पिंपरी, पिंपळद, तळेगाव, आंबोली, शिरसगाव, काचुर्ली आणि सापगाव या दहा गावांना गेल्या वर्षी भूसंपादनाच्या नोटिसा बदलण्यात आल्या होत्या.

प्रस्तावाच्या सुधारित मान्यतेनुसार भूसंपादनासाठी ६५२ कोटींची आवश्यकता आहे.

२००२ साली मेरीच्या अहवालानुसार गंगापूर धरणाच्या जिवंत साठ्यातून ४३.७४९ दलघमी साठा कमी झाला आहे. हा साठा पुनर्स्थापित करण्यासाठी या धरणाच्या उर्ध्व बाजूस किकवी नदीवर ७०.३६ दलघमी क्षमतेचे किकवी धरण उभारले जाणार आहे. किकवी प्रकल्पाच्या योजनेसाठी २६ ऑगस्ट, २००९ मध्ये २८३.५४ कोटी खर्चाला शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. यामध्ये ६०.०२ दलघमी उपयुक्त जलसाठा निर्माण होणार असून, पिण्याच्या पाण्यासाठी गंगापूर धरणावरील भार हलका होण्यास मदत होणार आहे.

त्र्यंबकेश्वर शहराच्या मध्यातून गोदावरी नदी प्रवाहित होत असल्याने पूर परिस्थिती निर्माण होणाऱ्या भागात पुर नियंत्रण करणे शक्य होईल. तसेच या प्रकल्पावर १.५० मेगा वॅट वीज निर्मिती केली जाणार आहे. परिणामी विजेचे भारनियमन कमी होण्यास मदत होईल. धरणाच्या बुडीत क्षेत्रास लागून असलेल्या वन क्षेत्राचा आणि वन्य प्राण्यांचा विकास करण्यात येणार आहे. आदिवासी क्षेत्रात सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

## सटाण्यातील ऐतिहासीक मंदिरातील मूर्तीचे शास्त्रशुध्द संवर्धन – मिट्टी फाउंडेशनचा पुढाकार

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------



सटाण्यातील आरम नदीकिनारी वसलेल्या श्री महालक्ष्मी मंदिरातील ऐतिहासिक मूर्तीचे शास्त्रशुद्ध जतन व संवर्धन यशस्वीपणे करण्यात आले. मिट्टी फाउंडेशनच्या सहकार्याने हे काम करण्यात आले. महालक्ष्मी मूर्ती ही दुर्मिळ तैलांगी अखंड पाषाणातील असून, तिचे सौंदर्य, स्थापत्य आणि धार्मिक महत्त्व उल्लेखनीय आहे.

ही मूर्ती इ.स. १५९० मध्ये बागलाणातील मुल्हेर गडावरील बागूलराजे नारायण शहा राठोड यांनी झंझ राजा यांच्याकडून आणून प्रतिष्ठापना केली होती. पुढे मुघल आक्रमणाच्या काळात भाविकांनी ही मूर्ती सुरक्षितपणे मोती टाक्यात लपवली होती. १८७५ मध्ये श्री यशवंतराव देवमामलेदार महाराजांनी मूर्तीची विधीवत प्राणप्रतिष्ठा केली. पुरातन मूर्ती असल्याने मूर्तीवर पाण्याचा, आर्द्रतेचा आणि प्रदूषणाचा थेट परिणाम होत असल्याने तिची झीज जलद होत होते.

अनेक ठिकाणी तडे, बारीक भेगा आणि जैविक वाढ दिसू लागल्याने मूळ रचना न बदलता आणि कोणतेही कृत्रिम रासायनिक घटक न वापरता नैसर्गिक द्रव्यांद्वारे संवर्धन करण्याचे आव्हान होते. अशा स्थितीत फाउंडेशनच्या वतीने ड्राय ब्रशिंग, स्टीम क्लिनिंग, बायोडल ट्रीटमेंट , हायड्रोफोबिक ट्रीटमेंट या प्रक्रियांचा वापर करण्यात आला. अशा प्रकारे संवर्धन करताना यामधे मुख्यत; वातावरणातील बुरशी आणि जीवाणूंची वाढ थांबविण्यासाठी नैसर्गिक उपाययोजना करण्यात आली.

यामुळे मूर्तीचे आयुर्मान अनेक दशकांनी वाढणार आहे. संवर्धनामुळे मूळ मूर्तीच्या अंतर्भागापर्यंत संरक्षण झाले असून तिचे आयुष्य अनेक दशक वाढू शकते. सर्व उपचार भविष्यात बदल करता येईल, अशा सुरक्षित पद्धतीने केले गेले. या प्रक्रियेत कोणत्याही रासायनिक पदार्थाचा वापर केलेला नाही. या सर्व प्रक्रियेनंतर मूर्ती अखेर दर्शनासाठी खुली झाली आहे.

उभ्या महालक्ष्मी मूर्तीच्या डोक्यावर धम्मिला मुकुट धारण आहे. मुकुटावर सर्वात वर सूर्य चंद्र प्रतिमा आहे. त्याखालील थरात शिवलिंग आहे. मुकुट अनंतनागवेष्टीत आहे. कपाळावर लतावल्लिका असून कानात सूर्यवृत्त प्रकारातील मकर कुंडले धारण केली आहे. स्मितहास्य असलेले मुखमंडल अत्यंत लोभस आहे. देवीने उजव्या बाजूच्या एका हातात महाळुंग फळ पकडलेले आहे. वरील हातातील तर्जनी मुद्रेत कौमोदीकी गदा आहे.

डावीकडील वरील हातात कटक मुद्रेत ढाल आहे. डावीकडील खालच्या हातात सूचीमुद्रेत अमृतपात्र-पानपात्र धारण केलेले आहे. कटी वस्त्रांवर कटिसूत्र, उरुद्दाम, मुक्तदाम, वनमाला व यज्ञोपवीत धारण केलेले आहे. हातामध्ये भरजरी कडे आणि पायात पैंजण आहे.

शहर आणि जिल्ह्यातील अनेक प्राचीन धार्मिकदृष्ट्या महत्त्व असलेल्या मूर्ती आणि मंदिराचे संवर्धन होणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या मूर्तींबाबत कोणाला माहिती असेल किंवा संवर्धनासाठी मदत हवी असेल तर मिट्टी फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांना योग्य ती मदत केली जाईल. याआधी वेगवेगळ्या पुरातन मंदिरांसाठी काम केले आहे. सटाणा येथील महालक्ष्मी मूर्ती संवर्धनात वेगवेगळ्या अडचणी होत्या. परंतु, ग्रामस्थ आणि अन्य सहकाऱ्यांच्या माध्यमातून या अडचणी पार केल्या. – **मयूर मोरे (शिल्पकार आणि तज्ज्ञ कला संवर्धक. मिट्टी फाउंडेशन, नाशिक)**

## मग राज्यातील सर्वच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, सचिव, संचालक मंडळ काय करत आहे...?

### श्री संजय बच्छाव- अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती धुळे जिल्हा

प्रवीण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------------------

आज कुठल्याच शेतमालाला योग्य बाजारभाव मिळत नाहीत. अगदी केंद्र सरकारने जाहीर केलेला हमीभाव सुध्दा शेतकऱ्यांना मिळत नाही. शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील आश्रू यांना दिसत नाहीत काय...?

शेतकऱ्यांच्या संस्था विविध कार्यकारी विकास सोसायट्यांच्या मार्फत सदर प्रतिनिधी निवडून गेले आहेत. बाजार समितीत शेतमाल आणल्यावर व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांच्या मानगूटावर सुरी फिरवून सर्व खर्च वसूल केला जात आहे. परंतू शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य बाजारभाव मिळवून देण्याची यांची जबाबदारी नाही काय...?.



शेतकऱ्यांनी शेतमाल पिकवायचा आणि बाजारभावासाठी पुन्हा रस्त्यावर उतरून संघर्ष करायचा, नाहीतर आत्महत्या करायच्या. मग हे शेतकऱ्यांचे लोकप्रतिनिधींची नेमकी जबाबदारी काय...?

आणखी किती दिवस शेतकऱ्यांच्या जीविताशी खेळ करण्याचे कट कारस्थान चालणार आहे...?. शेतकऱ्यांच्या खांद्यावर किती दिवस बंदूक ठेवणार...? . आजवर शेतकऱ्यांनी रस्त्यावर उतरून अनेक वेळा संघर्ष केला आहे... शेतकऱ्यांच्या आंदोलनात आजवर किती वेळा शेतकऱ्यांचे हे लोक प्रतिनिधी सामिल झाले आहेत...?

शेतकरी बंधूंनो शेतमालाला योग्य बाजारभाव मिळवून देणे, ही सुध्दा आपण निवडून दिलेल्या लोक प्रतिनिधींची सुध्दा तेवढीच जबाबदारी आहे...!

शेतकऱ्यांचा शेतमालाला योग्य बाजार भाव मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी विधानसभेत आवाज उठवावा.. नाहीतर येणाऱ्या काळात शेतकरी यांची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाहीत.

# नाबार्ड वर्धापन दिनानिमित्त वृक्ष लागवड; शिव पाणलोट समितीचा पर्यावरणपूरक उपक्रम

## जागृती शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतली पर्यावरणीय जबाबदारीची जाणीव; निसर्ग रक्षणाचा घेतला संकल्प

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------





वर्धापन दिनानिमित्त होट्टल येथील शिव पाणलोट समितीने उत्साहात विविध कार्यक्रम राबविले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश नाबार्डच्या ग्रामीण विकासासाठी केलेल्या योगदानाची माहिती देणे तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवणे हा होता. विशेषतः यावेळी वृक्षारोपणाचा उपक्रम राबवून समितीने पर्यावरणाच्या महत्त्वावर भर दिला.

शिव पाणलोट समितीच्या वतीने होणाऱ्या या कार्यक्रमात स्थानिक जागृतशाळेतील विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांना वृक्ष लागवडीच्या माध्यमातून निसर्गाच्या संवर्धनाचे महत्त्व समजावण्यात आले. वृक्ष याचं केवळ पर्यावरणासाठीच नव्हे तर मानवजातीच्या आरोग्यासाठीही किती उपयुक्त आहेत, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपली जबाबदारी लक्षात घेऊन अधिकाधिक वृक्षारोपण करण्याचा निर्धार व्यक्त केला.

नाबार्ड हे एक राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक असून, ग्रामीण भागातील शेतीसंबंधी व शाश्वत विकासाच्या कार्यक्रमांना वित्तीय व तांत्रिक मदत पुरवते. त्याच्या वर्धापन दिवशी अशा जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन ग्रामीण भागात विशेषतः केले जाते, ज्यामुळे सामाजिक व पर्यावरणीय जबाबदाऱ्या यांना चालना मिळते.या वृक्षारोपण उपक्रमातून नाबार्डची पर्यावरण संवर्धनासाठीची भूमिका अधोरेखित होते. स्थानिक समाजाला पर्यावरणविषयक जबाबदारीची जाणीव करून देणे हा या कार्यक्रमाचा महत्वाचा भाग होता. यामुळे विद्यार्थ्यांत आकाशा व भविष्याकडे जबाबदारीने पाहण्याची वृत्ती वाढेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमात सहभागी झालेल्यांनी नाबार्डच्या दीर्घकालीन ग्रामीण विकास धोरणांचे कौतुक केले व भविष्यातही अशा प्रकारच्या उपक्रमांना चालना देण्याचा प्रस्ताव मांडला. यामुळे परिसरात पर्यावरणीय आणि सामाजिक जागरुकता वाढेल, तसेच ग्रामीण भागाचा समृद्धी मार्गावर विकास होईल.

या कार्यक्रमामुळे स्थानिक समाजाची पर्यावरणीय बांधिलकी वाढेल तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव होईल, असे मत कार्यक्रम आयोजकांनी व्यक्त केले. नाबार्डच्या या वर्धापन दिनाच्या उपक्रमाने ग्रामीण भागातील पर्यावरणीय संवर्धनाला चालना मिळेल, ही मोठी अपेक्षा आहे.कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थांनी मा . रविद्र हुंडेकर API मरखेल पोलिस स्टेशन . जनजागृती शाळेचे संस्थापक मा गोपाळ सर नाईक . शाळेचे मुख्यध्यापक शेख सर ' मानसपूरे सर ' विश्वकर्मा सर , पवार सर .

एम जे थोरात तलाटी होट्टल , ग्रामविकास अधिकारी गज्जलवार साहेब होट्टल , मा . सरकाळे सर (कृषी साह्यक होट्टल )' होट्टल ग्रामपंचायत सरपंच प्रतिनिधी नागनाथ सुर्यवंशी प्रोजेक्ट हेड विद्या मॅडम ' सुहानी मॅडम ' किशोर काळे सर ' शिव पाणलोट समिती अध्यक्ष: शेषेराव गणपत सुर्यवंशी , सचिव : नारायण ( राजू पाटील ) काठेवाडी ' सदस्य - त्र्यंबक सुवर्णकार , बळीराम काठेवाडी . ' वंकलवार प्रभू रामलू , गंगाराम सुर्यवंशी ' अशोक वंकलवार ' गंगाधर वंकलवार आणि समस्त होट्टल आणि काठेवाडी येथील गावकरी उपस्थित होते.

# गोंडेगावचे सरपंच श्री धर्मेंद्र बोरकर यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिला प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जनसंपर्क कार्यालय, भंडारा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष व खासदार मा श्री प्रफुल पटेलजी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून ग्राम गोंडेगाव (ता. लाखनी) चे सरपंच श्री. धर्मेंद्र बोरकर यांनी आपल्या समर्थकांसह माजी आमदार श्री राजेंद्र जैन, जिल्हाध्यक्ष श्री नानाभाऊ पंचबुद्धे यांच्या उपस्थितीत पक्षाचा दुपट्टा वापरून अधिकृतपणे पक्षात प्रवेश केला.

या प्रवेशामुळे गोंडेगाव व परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा जनाधार अधिक मजबूत होणार असून स्थानिक पातळीवर विकास व जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम होईल. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे श्री. धर्मेंद्र बोरकर यांचे मनःपूर्वक स्वागत व अभिनंदन पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता यांनी केले.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय सचिव मा.श्री. राजेंद्रजी जैन, जिल्हाध्यक्ष श्री. नानाभाऊ पंचबुध्दे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष श्री. सुनिलभाऊ फुंडे, प्रदेश महासचिव श्री. धनंजय दलाल, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे वरिष्ठ नेते श्री.देवेंद्रनाथ चौबे, जि.प. उपाध्यक्ष श्री. एकनाथ फेंडर, अड. श्री. विनयमोहन पशिने, भंडारा तालुकाध्यक्ष नरेंद्र झंझाड, भंडारा दुध संघाचे संचालक हितेश सेलोकर, जि.प. सदस्य रजनिश बन्सोड, प्रदेश सेवादलचे उपाध्यक्ष श्री. शेखर (बाळाभाऊ) गभने, विजय खेडीकर, सुभाष तितिरमारे, निरज शहारे, शरद इटवले, तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील त्रुटी अजिबात खपवून घेतल्या जाणार नाहीत सभापती तेजराम चव्हाण

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------------



" शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील कमकुवतपणा अजिबात सहन केला जाणार नाही," असे स्पष्ट मत पंचायत समिती तिरोडा चे नविन सभापती माननीय श्री तेजरामजी चव्हाण यांनी व्यक्त केले आहे. आमदार विजयभाऊ रहांगडाले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर कामाचा जोरदार प्रारंभ केला असून, विशेषतः शिक्षण व आरोग्य या क्षेत्राकडे त्यांचे लक्ष केंद्रीत आहे.

सभापती चव्हाण यांनी स्पष्ट केले की, “ विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळाल्याच पाहिजेत. या बाबतीत कोणतीही तडजोड मान्य नाही.” ते नागरिकांच्या समस्या सोडविण्यावर आणि शासकीय योजनांचा लाभ अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचविण्यावर भर देत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या शाळांना अचानक भेटी देण्याचे सत्र सुरू केले आहे.

शाळांना दिल्या अचानक भेटी

सभापती चव्हाण यांनी पंचायत समिती सदस्य चेतलालभाऊ भगत यांच्यासह अत्री, गोंडमोहाडी आणि बोदा येथील जिल्हा परिषद शाळांना भेट दिल्या.

अत्री शाळा – वर्गखोल्या आणि शाळेतील सुविधा पाहून समाधान व्यक्त. उणीवा दूर करण्याबाबत मार्गदर्शन.

बोदा शाळा – विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. परिसर स्वच्छता, पोषण आहार व विद्यार्थ्यांची गुणवत्ता यावर विशेष लक्ष दिले. मुख्याध्यापिका सौ. ए.एम. चव्हाण यांनी स्वागत केले.

गोंडमोहाडी शाळा – शाळेतील वर्ग, स्वच्छतागृहे, किचन शेड, पिण्याच्या पाण्याची सुविधा, "एक पेड मां के नाम" यासह विविध उपक्रम तपासले. पोषण आहाराची चव घेऊन समाधान व्यक्त केले.

या संपूर्ण दौऱ्यात सभापतींनी शाळांमध्ये असलेल्या काही गरजा, सुधारणा व योजनांच्या अंमलबजावणीबाबत सूचनाही दिल्या. या दौऱ्याबाबत माहिती बिहारीलालजी रहांगडाले (रा. वडेगाव) यांनी दिली.

# बस- दुचाकीची समोरासमोर धडक; दोघांचा मृत्यू, चिमुकली बचावली

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------------



देगलूर तालुक्यातील हानेगाव परिसरात शनिवारी सकाळी भीषण अपघात घडला. वझर ते कुंदराळा राज्य मार्गावर औराद-वझर कॉर्नरवर एसटी बस आणि दुचाकीची समोरासमोर धडक होऊन दोघांचा मृत्यू झाला. या अपघातातून दुचाकी चालक आणि तीन वर्षांची चिमुकली बचावल्याने सुदैवच म्हणावे लागेल.

प्राप्त माहितीनुसार, शनिवारी (दि. १२) सकाळी ११ वाजेच्या सुमारास वझरमार्गे उदगीरकडे जाणाऱ्या एसटी बस (क्र. एमएच-२० बीएल-१९८३) आणि दुचाकी (क्र. एमएच-२६ एपी-१३७७) यांची समोरासमोर जोरदार धडक झाली. दुचाकीवर चार जण प्रवास करत होते. या अपघातात नरसिंगराव एकनाथराव पाटील (७०, रा. कामाजी वाडी) आणि पुंडलिक पाटील (७५, रा. कुडली) यांचा उपचारासाठी नेत असताना मृत्यू झाला. दुचाकी चालक वामनराव नारायण बिरादार (६०) आणि शिवानी संदीप बिरादार (वय ३) या चिमुकलीला किरकोळ दुखापत झाली. अपघातानंतर मरखेलचे सहायक पोलिस निरीक्षक रवींद्र हुंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार डी. बी. पाटील, संदीप बोधमवाढ व माजिद पठाण यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना उपचारासाठी हलवले. झालेल्या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# राज्य सरकारने राज्य उत्पादन शुल्क अंतर्गत लागू केलेली दरवाढ विरुद्ध बार संघटनेकडून बार बंद ठेवून निषेध

गोविंद ढगे
लोहा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



राज्य सरकारने राज्यात मद्य विक्रीतील दरवाढ दुप्पट केली असून परवाना शुल्कात देखील वाढ केल्याच्या निषेधार्थ बार असोसिएशन च्या वतीने लोहा शहरातील सर्व बार बंद ठेवून राज्य सरकारच्या अन्यायकारक कर वाढीचा निषेध नोंदवून लोह्याचे तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

मागील कांहीं दिवसांपूर्वी राज्य सरकारने मद्यावरील कर वाढीचा निर्णय घेतला होता.त्यामुळे राज्यात मद्य विक्रीची दुप्पट वाढ केली. तसेच बार च्या शुल्कामध्ये पंधरा टक्के तर उत्पादन शुल्कामध्ये साठ टक्के वाढ केली. त्यामुळे त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बोगस व अनधिकृत दारू विक्री होऊन त्याचा फटका बार दुकानास होईल. दारू वरील करवाढीमुळे बार मधील ग्राहक थंडावून त्याचा फायदा अवैध विक्री करणाऱ्यांना होईल त्यामुळे राज्य सरकारने दारूवरील वाढ, परवाना शुल्क आणि उत्पादन शुल्कात करण्यात आलेली वाढ रद्द करावी अशा मागणीचे निवेदन लोह्याचे नायब तहसीलदार राजेश पाठक यांना दिले. निवेदनावर लोहा बार असोसिएशन चे मधु पाटील पवार, संभाजी चव्हाण, संतोष वाकडे, माधव पवार, चंद्रकांत कळकेकर, कामेश पवार, देविदास बोनागिरे, माधव हामदे, संग्राम पवार, सौरभ लुंगारे, संतोष तेलंग, बब्रुवान पवार, अशोकराव संगे वार, केशव पाटील, बंडेवार आदींच्या स्वाक्षरी आहे.

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा धुळे जिल्ह्याचा प्रेरणा मेळावा उत्साहात संपन्न

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------------



पिंपळनेर येथील कर्मवीर आ.मा. पाटील विद्यालयात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या धुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा प्रेरणा मेळावासंपन्न झाला. या मेळाव्यात जिल्ह्यातील सर्व शाखांमधील जवळपास ५० कार्यकर्ते उपस्थित होते. महाराष्ट्र अंनिसच्या पिंपळनेर शाखेने या मेळाव्याचे संयोजन केले.

या मेळाव्यात महाराष्ट्र अंनिसचे राज्य प्रधान सचिव विनायक सावळे, निधी व्यवस्थापन विभागाचे राज्य कार्यवाह प्रा.परेश शाह, जिल्हा उपाध्यक्ष सुरेंद्रदादा मराठे व डॉ. शरद वाणी, जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. भूषण पाटील जिल्हा प्रधान सचिव नवल ठाकरे आणि प्रा. संदीप गिरासे ,सुरेश पारख यांचे सह जिल्ह्यातील सर्व शाखांचे कार्याध्यक्ष, प्रधान सचिव व कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्ह्यातील धुळे, निमगुळ, सामोडे, पिंपळनेर, शिंदखेडा, वाघाडी, साक्री, कासारे, दहिवेल या शाखांचे मिळून ५० कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

मेळाव्याची सुरुवात प्रा. रणजीत शिंदे, विनायक सावळे आणि प्रा.संदीप गिरासे यांनी ' मानवता जपा' यांनी गीताच्या सादरीकरणाने केली.

उद्घाटन सत्रात प्रा. भूषण पाटील यांनी प्रास्ताविकात मेळाव्याचा उद्देश व दिवसभराच्या कामकाजाची रुपरेषा सांगितली. पिंपळनेर शाखेच्या वतीने मराठे आप्पा यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पिंपळनेर शाखेची स्थापना डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या उपस्थितीत झाल्याची आठवण करून दिली.

त्यानंतर विनायक सावळे यांनी शहादा येथील विस्तारित राज्य कार्यकारिणीचा सविस्तर वृत्तांत सादर केला.

या मेळाव्यात जिल्ह्यातील सर्व शाखांच्या कामांचा आढावा घेण्यात आला. दुपारच्या सत्रात येत्या तीन महिन्यातील कामकाजाचे शाखानिहाय नियोजन करण्यात आले. यात प्रामुख्याने पुढील दोन महिन्यात करावयाच्या शाखा भेटींचे नियोजन करण्यात आले. लैंगिकता प्रबोधन सप्ताह, सर्प विज्ञान सप्ताह, ९ ऑगस्ट स्थापना दिवस, २० ऑगस्ट शहिद डॉ.नरेंद्र दाभोलकर यांचा बलिदान दिवस, वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प अंतर्गत शिक्षकांचे प्रशिक्षण व स्वयंअध्ययन परीक्षा, पर्यावरणपूरक गणेशोत्सव तसेच वार्षिक विशेषांकासाठी जाहिराती - देणग्या संकलन यांचे नियोजन करण्यात आले. तसेच समितीचे मुखपत्र असलेल्या अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे वर्गणीदार वाढवण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

या मेळाव्यात साक्री शाखेचे जेष्ठ कार्यकर्ते डॉ.दिलीप लोखंडे यांच्या "लोकसंवादक -संत कबीर" या पुस्तकाच्या हिंदी आवृत्तीचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रात यश मिळविलेल्या साथींच्या सन्मान करण्यात आला.

चळवळीचे पाठीराखे जेष्ठ कलावंत निळूभाऊ फुले यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

हा मेळावा यशस्वी होण्यासाठी पिंपळनेर शाखेचे ए.बी. मराठे , व्ही.एन. जीरे पाटील, शिरीष कुवर, देविदास कुवर, प्रा.मिनाक्षी माळी,मनीषा भदाणे, छाया वाडेकर, ललिता जाधव, रेखा पाटील , ललित मराठे, सुभाष जगताप, प्रा.शिवप्रसाद शेवाळे, देविदास पाटील,डी.डी.महाले यांनी परिश्रम घेतले.

हम होंगे कामयाब गीताने मेळाव्याची सांगता झाली.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# रोजगार सेवक निवड प्रक्रियेत मोठा घोटाळा? दहेगाव ग्रामसभेतील मतदानावर संशयाचा धूर?

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------------




आमगाव तालुक्यातील दहेगाव ग्रामपंचायतीच्या ग्राम रोजगार सेवक पदासाठी झालेल्या निवड प्रक्रियेमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करत ही संपूर्ण प्रक्रिया रद्द करून पुन्हा निवडणूक घेण्याची मागणी होत आहे. श्री. प्रदीप आत्माराम नागोशे (वय २४, रा. दहेगाव) या स्थानिक उमेदवाराने खंड विकास अधिकारी, जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद गोंदिया यांच्याकडे याबाबत तक्रार सादर केली आहे.

१८ वर्षांखालील व बाहेरगावच्या दि. २३ जून २०२५ रोजी झालेल्या विशेष ग्रामसभेत १८ वर्षांखालील युवकांकडून मतदान करून घेण्यात आल्याचा खळबळजनक आरोप करण्यात आला आहे. तसेच, गावाबाहेरील व अपात्र नागरिकांनाही मतदान प्रक्रियेत सामील करण्यात आले. यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर संशय निर्माण झाला आहे. विशेष ग्रामसभेच्या रजिस्टरमध्ये नाव व स्वाक्षरी घेतली गेली, परंतु मतदारांची ओळख पटवण्यासाठी कोणतेही आधारकार्ड, मतदान कार्ड इत्यादींची पडताळणी करण्यात आली नाही. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया संशयास्पद ठरत आहे, असे नागोशे यांनी म्हटले आहे.

“ही निवड प्रक्रिया आधीच ठरवून ठेवलेली होती. पात्र उमेदवारांचा छळ करून, सत्ताधारी गटाशी संबंधित उमेदवाराची निवड केली गेली,” असा आरोप करत नागोशे यांनी निवड रद्द करून नवी प्रक्रिया पारदर्शकपणे घेण्याची मागणी केली आहे.

ग्राम रोजगार सेवक हे जबाबदारीचे पद असून, त्याच्या निवडीसाठी पारदर्शक परीक्षा पद्धत का राबवली गेली नाही? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

ग्राम रोजगार सेवक पदासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक अहर्ता, संगणक ज्ञान, अनुभव व प्रमाणपत्रांची कसून तपासणी झाली होती का? हे देखील विचारात घेण्याजोगे आहे. तक्रारकर्त्यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला आहे की, निवड झालेला उमेदवार 'तंटामुक्ती अध्यक्ष' सुद्धा आहे. शासन नियमानुसार एकाच व्यक्तीकडे दोन पदे असणे योग्य आहे का? या प्रकरणात पंचायत समिती सदस्य, सभापती व इतर स्थानिक जनप्रतिनिधी यांची भूमिका काय आहे? आणि पुढे ते या प्रक्रियेबाबत कोणते पावले उचलणार याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुथीरकर यांनी प्रतिक्रिया दिली की, “तक्रार प्राप्त झाली असून चौकशी करून दोषी आढळल्यास योग्य ती कारवाई केली जाईल.”

तर ग्राम विकास अधिकारी श्री. उपराडे यांनी सांगितले की, “ ग्रामसभेमध्ये जर अनियमितता झाल्यास ती सखोल चौकशीअंती निष्पक्ष कार्यवाही केली जाईल.” सविस्तर पणे पुढील अंकात माहिती प्रकाशित करण्यात येईल

# देगलूर ते हाणेगाव, मुक्रमाबाद रस्ता झाला मृत्यूचा सापळा; संतप्त नागरिकांचा २१ जुलै रोजी रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------------



देगलूर ते हाणेगाव आणि देगलूर ते मुक्रमाबाद रस्ता अक्षरशः मृत्यूचा सापळा ठरत असून, यावरील खड्डे आणि खराब स्थितीमुळे आतापर्यंत तब्बल १३ जणांचा मृत्यू झाला आहे, तर १०० ते १५० अपघातांची नोंद झाली आहे. या पार्श्वभूमीवर संतप्त नागरिकांनी २१ जुलै रोजी छत्रपती संभाजी महाराज चौक, करडखेड येथे तीव्र रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

या रस्त्याची अत्यंत बिकट अवस्था असून, नागरिकांनी वेळोवेळी प्रशासनाला अर्ज, निवेदने सादर केली. मात्र शासन व प्रशासनाच्या बेफिकिरीमुळे अजूनही कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत. परिणामी नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे:

१. देगलूर–हाणेगाव आणि देगलूर–मुक्रमाबाद रस्ता नव्याने व मजबुतीने बनवावा.

२. रस्त्याच्या दुतर्फा वाढलेले काटेरी झुडपे व जुनाट झाडे तात्काळ हटवावीत.

३. सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्यावर तातडीने डांबरीकरण करून खड्डे बुजवावेत.

४. अतिक्रमणमुक्त रस्ता शासन नियमानुसार मोकळा करण्यात यावा.

५. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघात होऊन जिवीतहानी झाल्यास संबंधित लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा.

या मागण्या लवकरात लवकर मान्य करून तातडीने कृती झाली नाही, तर या परिसरातील जनतेच्या संयमाचा बांध फुटेल आणि यापेक्षा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा सज्जड इशारा आंदोलकांनी दिला आहे.

# कर्जत येथील शासकीय विश्रामगृहावर वंचित युवा च्या पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न

पल्लवी शेलार
श्रीगोंदा तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------------



रविवार दि .१३ जुलै ०२५ रोजी दुपारी एक वाजता कर्जत येथील शासकीय विश्रामगृहावर वंचित युवा च्या तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची संवाद बैठक संपन्न झाली. राज्य प्रवक्ता ॲड अरुण जाधव (आबा), जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भैलुमे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आणि चांगदेव सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली सदर बैठक पार पडली अनेक उन्हाळी पावसाळी येत असतात जात असतात अशा अनेक संकटाशी सामना करत आपण सर्व बाळासाहेबांचे भीमसैनिक लढत असतो. पदाधिकाऱ्याने नेहमी आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घ्यावा यांच्या आदेशाचे पालन करावे,evm मशीन मुद्दा असेल,जन सुरक्षा कायदा हा मुद्दा असेल अत्यंत ताकतीने बाळासाहेब लढत आहेत, जन सुरक्षा कायदा बाबत कोणत्याही आमदाराने भूमिका व्यक्त केली नाही अगदी आपल्या मतदारसंघाचे आमदार रोहित पवार यांनी देखील याबाबत भूमिका व्यक्त केलेली नाही ही खेदाची बाब आहे, प्रत्येक गावात जाऊन पदाधिकाऱ्याने शाखेची बांधणी केली पाहिजे कोणत्याही पक्षाबरोबर युती करण्याचे आदेश आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांनी दिले आहे यासाठी पक्षाची बांधणी महत्वाची आहे, पदे येतात पदे जातात कार्यकर्त्यांनी नेहमी बाळासाहेबांचा सैनिक म्हणून काम करायला पाहिजे.

बाबासाहेबांच्या नातवासोबत तुम्ही आम्ही काम करीत आहोत मोठे नशीबवान आहात त्यांच्या सईचे पत्र आपणास दिले आहे ते फार मोठी बाब आहे पक्षाचे आलेले मेसेज प्रत्येक पदाधिकाऱ्याने पुढे पाठवला पाहिजे आपण बाळासाहेबांचे सैनिक कुणाच्या बापाला घाबरायचे नाही, सत्ता ताब्यात घेण्यासाठी एकत्र लढू असे मार्गदर्शन यावेळी राज्य प्रवक्ते ॲड जाधव आबा यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना पदाधिकारी संवाद बैठक सुरू असता केले.

पदाधिकाऱ्याने निस्वार्थीपणाने पक्षाचे काम करावे बाळासाहेबांचे हात बळकट करावेत आपसातील मतभेद सोडून येणाऱ्या आगामी पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुका सामोरे जाण्यासाठी कार्यकर्त्यांनी गावागावात शाखा ओपन कराव्यात आणि उद्याच्या आगामी निवडणुका लढण्यासाठी मैदान तयार करावे अशी भूमिका यावेळी जिल्हाध्यक्ष सोमनाथ भैलुमे यांनी या पदाधिकारी संवाद बैठकीमध्ये व्यक्त केली. जिल्हा महासचिव संजय शेलार तालुका अध्यक्ष दत्ता भालेराव तालुका महासचिव राजू गायकवाड यांनी पदाधिकारी संवाद बैठक यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले, जिल्हा उपाध्यक्ष दीपक ससाने ,जिल्हा उपाध्यक्ष लखन पारसे, जिल्हा उपाध्यक्ष सचिन गायकवाड, जिल्हा सह संघठक अंकुश साळवे, जामखेड तालुकाध्यक्ष आतिश पारवे, महिला आघाडी तालुकाध्यक्षा रूपालीताई आढाव, चंपा साळवे नेता साळवे ,श्याम आढाव ,गोदड समुद्र, कपिल गंगावणे , रवींद्र सोनवणे , कर्जत शहराध्यक्ष विकास समुद्र , अंकुश साळवे , दीपक ससाने , लखन पारसे , अजय गोरे , ज्ञानू बर्डे, करण ओव्हळ कुंदन शेलार यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# पँक्रियाटिक डक्टमध्ये झालेल्या भगदाडामुळे झुंजणाऱ्या रुग्णाला ERCP (एन्डोस्कोपिक रेट्रोग्रेड कोलॅन्जिओ पँक्रियाटोग्राफी) उपचाराने मिळाले जीवनदान!

## मध्यप्रदेशातील रुग्णाचा गोंदियातील 'राणी अवंतीबाई सुपर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल'मध्ये यशस्वी उपचार

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------------









मृत्यूच्या दारातून परत आलेल्या विनोद पटले (वय ३२) या तरुणाने गेल्या वर्षभरात एक दुर्मिळ आणि जीवघेणी आजार – पँक्रियाटिक डक्ट लीक – विरुद्ध संघर्ष केला. मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील खैरलांजी तालुक्यातील फुटारा गावातील रहिवासी असलेले विनोद आता पूर्णतः बरे झाले असून, याचे श्रेय जाते गोंदिया येथील 'राणी अवंतीबाई सुपर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल' मधील कुशल डॉक्टर्स, विशेषतः डॉ. राजू माहुले आणि त्यांच्या संपूर्ण टीमला.

विनोद यांना सुरुवातीला कॉमन बाईल डक्ट (CBD) मध्ये स्टोन असल्याची तक्रार होती, ज्यामुळे वारंवार पिवळ्या कावळ्याचा त्रास होत होता. परिस्थिती इतकी गंभीर झाली की, डक्टचा भगदाड झाला आणि त्यामुळे पोटात तीव्र जळजळ, पाण्याचा साच, रक्ताची उलटी, भूक न लागणे आणि शरीरात कमजोरी अशा अनेक त्रासांनी ते ग्रस्त झाले. डॉक्टरांच्या मते वेळेत उपचार न मिळाल्यास ही स्थिती प्राणघातक ठरू शकत होती.

पटले कुटुंबीयांनी नागपूरमधील तीन मोठ्या रुग्णालयांत उपचाराचा प्रयत्न केला, मात्र समाधानकारक परिणाम मिळाला नाही. निराशेच्या गर्तेत असलेल्या कुटुंबाने उपचाराची आशाच सोडली होती. अशा संकटाच्या वेळी विनोद यांचे काका यांनी गोंदियातील 'डॉ. माहुले गैस्ट्रो अँड इन्फर्टिलिटी सेंटर' यांची माहिती दिली.

तत्काळ डॉ. राजू माहुले यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यांच्या टीमने विनोद यांची सखोल तपासणी करून उपचार सुरू केले. एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या ऑपरेशननंतर विनोद यांची प्रकृती लवकरच सुधारली आणि आता ते पूर्णतः बरे आहेत. ते पुन्हा चालू-फिरू शकतात आणि सामान्य जीवन जगत आहेत.

" हे हॉस्पिटल आमच्यासाठी देवदूत आहे" – विनोद पटले

भावूक होत विनोद म्हणाले –

“ मी नागपूरच्या अनेक हॉस्पिटल्सना भेट दिली, पण कुठेही दिलासा मिळाला नाही. राणी अवंतीबाई हॉस्पिटलमध्ये गेल्यावरच आशेचा किरण दिसला. डॉ. माहुले आणि त्यांच्या टीमने जे उपचार केले, ते आमच्यासाठी चमत्कारापेक्षा कमी नव्हते.”

कुटुंबाचे आभार पटले कुटुंबाने डॉ. राजू माहुले आणि त्यांच्या समर्पित टीमचे आभार मानले.

“आम्ही जेव्हा जीवनाची आशा सोडली होती, त्याच वेळी या हॉस्पिटलने आम्हाला पुन्हा जगण्याची संधी दिली. आम्ही कायम ऋणी राहू.”

हा संपूर्ण प्रकार याचे उदाहरण आहे की योग्य वेळेवर, योग्य उपचार आणि समर्पित डॉक्टरांची टीम एखाद्याचे प्राण वाचवू शकते. गोंदिया जिल्ह्यातील 'राणी अवंतीबाई सुपर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल' हे केवळ जिल्ह्यासाठी नव्हे, तर आसपासच्या राज्यांतील रुग्णांसाठीही आशेचा किरण ठरू लागले आहे.

# संशोधनाच्या संरक्षणासाठी बौद्धिक संपदा अधिकार आवश्यक - डॉ. प्रशांत कोळी

## कर्मवीर गणपत दादा मोरे निफाड महाविद्यालयात बौद्धिक अधिकार संपदा कार्यशाळा संपन्न

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------




आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या आणि माहितीच्या युगात नवकल्पना आणि वेगळं पण सिद्ध करणारे संशोधन हे वैज्ञानिक भारताच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीचे मुख्य स्त्रोत आहे . नवकल्पनांची आणि संशोधनाची योग्यरीत्या नोंद व संरक्षण करण्यासाठी बौद्धिक संपदा अधिकार आवश्यक असल्याचे मत डॉ. प्रशांत कोळी यांनी व्यक्त केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयात बौद्धिक संपदा अधिकार या विषयावर शनिवार दि.१२ जुलै रोजी एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ ज्ञानोबा ढगे,प्रा डॉ विक्रम जाधव, प्रा भगवान कडलग प्रा मोहाड प्रा डॉ सुसान लॉरेन्सिया प्रा योगेश कडलग प्रा आर एस मोहोड प्रा भाऊराव मुंतोंडे आदी उपस्थित होते

प्रा डॉ प्रशांत कोळी पुढे म्हणाले की, औद्योगिक क्रांतीनंतर संशोधनाला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे परंतु नवकल्पनांच्या साह्याने निर्माण केलेल्या कलाकृती, संशोधन , डिझाईन, सॉफ्टवेअर इत्यादीचे संरक्षण करण्याची गरज भासू लागली म्हणून बौद्धिक संपदा अधिकार निर्माण त्यामुळे पेटंट कॉपीराईट ट्रेडमार्क आदीमुळे संशोधनाचे संरक्षण झाले. यासाठी संशोधकांनी आपल्या नवकल्पनांची नोंदणी बौद्धिक संपदा अधिकार कायद्या अंतर्गत करणे आवश्यक आहे . असे प्रतिपादन केले.

या कार्यशाळेत डॉ. विक्रम जाधव प्रा. भगवान कडलग यांनी देखील मार्गदर्शन केले. डॉ.विक्रम जाधव यांनी बौद्धिक संपदा अधिकाराचे महत्त्व विशद केले प्रा. भगवान कडलग यांनी देशातील अनेक विद्यापीठे आता बौद्धिक संपदा अधिकार या विषयक अभ्यासक्रम तयार करीत आहे हा अभ्यासक्रम नव संशोधकांना प्रोत्साहन ठरवू पाहत आहे. याविषयीची माहिती दिली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे हे होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतात त्यांनी ग्रामीण भागातील संशोधकांमध्ये संशोधनाचा खजिना आहे ,त्यांच्या संशोधन कृतीला योग्य चालना दिल्यास दर्जेदार संशोधन निर्माण होईल.बौद्धिक संपदा सर्जनशीलता आणि नावीन्यतेला प्रोत्साहन देते. त्यामुळे संशोधक, कलाकार, उद्योजक आणि तंत्रज्ञ आपल्या कल्पना प्रत्यक्षात आणून समाजाला काहीतरी नवे देऊ शकतात. विद्यार्थ्यांनी आणि नव संशोधकांनी आपल्या नवकल्पना मर्यादित न ठेवता त्याची नोंदणी करून आपल्या नवकल्पनांना संरक्षण करून देण्याची गरज प्राचार्यांनी विशद केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती आर.एस. मोहोड यांनी केले. आभार प्रदर्शन श्रीमती चैताली कापसे यांनी केले. फोटो ओळ

निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयात बौद्धिक संपदा अधिकार कायदा कार्यशाळा प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा डॉ प्रशांत कोळी,व्यासपीठावर प्राचार्य डॉ ज्ञानोबा ढगे,प्रा भगवान कडलग, प्रा डॉ विक्रम जाधव, प्रा डॉ सुसान लॉरेन्सिया प्रा योगेश कडलग प्रा आर एस मोहोड आदी.

# "स्वराज्याची ज्योत प्रत्येक मनात पेटवण्याचे कार्य हेच जागर प्रतिष्ठानचे ध्येय...!"

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------







छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे प्रचार-प्रसार आणि युवामध्ये राष्ट्राभिमान जागवण्यासाठी कार्यरत असलेल्या जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे १३ जुलै रोजी किल्ले रामशेज येथे अभ्यासू मोहीम आणि कार्यकारिणी बैठक मोठ्या उत्साहात पार पडली.

या प्रसंगी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष किसनरावजी पाटील यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी सखोल चर्चा करत,

शिवचरित्र आणि राष्ट्रभक्तीच्या विचारांचे समाजात प्रभावी पातळीवर प्रसारण कसे करावे,

हे विचारमंथन केले. त्यांनी सांगितले की, " फक्त विचार न मांडता, आचरणात आणले तरच खऱ्या अर्थाने जागर होतो."

बैठकीत संघटनात्मक विस्तार, एकत्रित कार्यपद्धती, युवामधील संवाद, आणि सोशल मीडिया प्रचार यावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान अनेक पदाधिकाऱ्यांची नावे जाहीर करण्यात आली: यावेळी अशोकजी आगे – समन्वयक जागर प्रतिष्ठान, रोहनशेठ काठे – नाशिक जिल्हाध्यक्ष जागर प्रतिष्ठान, गोरख चव्हाण - तालुका प्रमुख,अशोक आडे – तालुका समन्वयक, यावेळी नवनियुक्त पदाधिकारी नियुक्त करण्यात आले. त्यात अनिकेतराव दाभाडे – नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख विवेकजी बैरागी – सिन्नर तालुकाध्यक्ष

या वेळी प्रतिष्ठानचे इतर सर्व पदाधिकारी व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर रामशेज किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करत सर्व कार्यकर्त्यांनी "शिवतेज जागवू, स्वराज्य घडवू" हा निर्धार केला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जागर प्रतिष्ठान परिवाराचे विशेष कौतुक होत आहे.

पुढील काळात हा उपक्रम राज्यभर प्रभावीपणे राबवण्यात येईल, असेही यावेळी सांगण्यात आले.

# महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

## स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान...
स्वराज्याचा मान !!



महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

## प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

**8446673677 / 8010232449**